# Washim District Police

**Nature of Work** :- गंभीर गुन्ह्यांचा उत्कृष्टरित्या तपास व उकल

**Police Station** :- **SP Office Washim**

**Date of Good Work done** :- **16/05/2022**

**Brief of the work done :-**

गंभीर गुन्ह्यांचा उत्कृष्टरित्या तपास व उकल करत गुन्हेगारीस प्रतिबंध करणाऱ्या तसेच दोषसिद्धीसाठी विशेष मेहनत घेणाऱ्या पोलीस अधिकारी/ अंमलदारांचा सत्कार पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह (भा.पो.से.) यांच्याहस्ते पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन करण्यात आला.

लोकमत

अल्पावधीतच गुन्ह्यांची उकल : कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न

## आरोपींना चाप; कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप!



लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** अलीकडच्या काळात घडलेल्या गंभीर गुन्ह्यांची उकल अल्पावधीतच करण्यात वाशिम पोलीस दलाला यश आले आहे. गुन्ह्यांची उकल करण्यात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा १२ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचे काम वाशिम जिल्हा पोलीस दल यशस्वीपणे करत आहे. त्या पार्श्वभूमीवर १२ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय येथील सभागृहात सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांच्या आढावा बैठकीचे आयोजन पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या अध्यक्षतेखाली केले होते.

नुकत्याच झालेल्या रामनवमी व रमजान ईद शांततेत पार पडण्याकामी जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांनी विशेष मेहनत घेतली व बंदोबस्त यशस्वीरीत्या पार पडला. त्याबद्दल पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी सर्वांचे कौतुक केले.

जिल्हा सामान्य रुग्णालय अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण समितीचे डॉ.पांढरकर व पथकाने तंबाखूजन्य पदार्थांचा गैरकायदेशीर वापर, कोटपा कायद्यांतर्गत प्रकरणे व उपाययोजना याबाबत उपस्थितांना माहिती दिली.

केकतउमरा येथील पुजाऱ्याच्या खून प्रकरणाचा उत्कृष्ट तपास करत सदर गुन्हा २४ तासांचे आत उघडकीस आणल्याबद्दल पो.स्टे.वाशिम ग्रामीणच्या परिविक्षाधीन सहायक पोलीस अधीक्षक महक स्वामी (आयपीएस) व त्यांचे पथकाचा, स्थानिक अल्लाडा प्लॉटवरील रस्त्यावर व्यापाऱ्यास अडवन १७ लाख रुपयांची जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस ३६ तासांचे आत अटक, तसेच रिसोड, मंगरुळपीर, मालेगाव येथे जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक करून, त्यांच्याकडून ७ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याबद्दल स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदारांचा, तसेच राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या पैरवी अधिकारी व अंमलदारांचा, त्याचबरोबर जनसंपर्क अधिकारी कार्यालयात उत्कृष्टपणे काम करणारे अंमलदार पो.कॉ.विठ्ठल सुर्वे असे एकूण ६ अधिकारी व २६ अंमलदार यांचा सत्कार पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्याहस्ते प्रशस्तिपत्र व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

### 'भोंग्या'प्रकरणी एसडीपीओंना सूचना

यावेळी अनधिकृत भोंगे व लाउडस्पीकरबाबतही चर्चा करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन तंतोतंत करण्यासंदर्भात सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) व सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या.